पुणे महानगरपालिका

विधी समिती

कार्यपत्रिका क्र. ४

विधी समितीची पाक्षिक सभा बुधवार दि. ०८/०७/२०२६ रोजी दुपारी ४.०० (चार) वाजता मा. समिती सभागृह, नवीन विस्तारीत ईमारत, पुणे महानगरपालिका येथे भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

विषय क्र. ८

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील खातेप्रमुख या संवर्गात १० वर्षे पेक्षा जास्त सलग सेवा झालेल्या अधिकाऱ्यांच्या नामभिधान बदलास खालीलप्रमाणे मा. विधी समितीमार्फत मा. महानगरपालिका मुख्य सभेची पश्चात मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था/१६९ दि. १०/०६/२०२६ चे पत्र.

१. श्री. गणेश श्रीराम सोनुने, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांच्या पदास दि. १८/१०/२०२३ पासून सह महापालिका आयुक्त (आपत्ती व्यवस्थापन अधिकारी) असे संबोधण्यास तसेच मुख्य उद्यान अधिक्षक या पदास जे अधिकार आहेत ते सर्व अधिकार, सह महापालिका आयुक्त (आपत्ती व्यवस्थापन अधिकारी) यांना देण्यास.

२. पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील खातेप्रमुख संवर्गातील जागेवर नियुक्त अधिकाऱ्यांची सलग १० वर्षे सेवा किंवा जास्त कालावधीसाठी कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना बढतीची संधी नाही म्हणून त्यांचे पदाचे नामभिधान बदलून ते सह महापालिका आयुक्त (जॉईंट म्युनिसिपल कमिशनर) असे करणेस मात्र ज्या अधिकाऱ्यांचा हुद्दा अधिनियमात हुद्दा नमुद केल्यामुळे हा हुद्दा बदलता येणार नाही, त्यांना 'सह महापालिका आयुक्त' समकक्ष समजण्यात यावे व त्यांना सह महापालिका आयुक्त यांना देण्यात येणारे सर्व फायदे व मान्य दराने विशेष वेतन देण्यास.

(टिप :- सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २४/०६/२०२६ च्या सभेत ठरले होते.)

नगर सचिव
पुणे महानगरपालिका